

परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे



बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 93 | रविवार दि. 26 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# उद्धव ठाकरे यांची मध्यरात्री मुख्यमंत्र्यांसोबत वर्षावर भेट

## मोठा राजकीय भूकंप होणार?



विधान परिषद निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तशा राजकीय घडामोडींना वेग आला आहे. त्यातच उद्धव ठाकरे हे मध्यरात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वर्षा बंगल्यावर भेटल्याचा दावा करण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या प्रबुद्ध भारत या मीडिया हाऊसने याविषयीचे ट्विट केले आहे. त्यामुळे राज्यात खळबळ उडाली आहे. ही भेट नेमकी कोणत्या अनुषंगाने झाली. एकेकाळच्या या दोन मित्रांमध्ये कोणत्या मुद्यावर चर्चा झाली हा सध्या राज्यात औत्सुक्याचा विषय ठरला आहे. गेल्या काही वर्षांपासून या दोन्ही नेत्यांमधील बेबनाव आणि युती तोडल्याचे शल्य ही वारंवार दिसले. तर या महिन्याच्या सुरुवातीला विधान परिषदेच्या निवृत्त होणाऱ्या आमदारांच्या समारोपाच्या कार्यक्रमात दोन्ही नेत्यांनी जोरदार शेरोशायरी केली आणि एकमेकांना आदरही दाखवला. या दोघांमधील जुगलबंदी ही चर्चेचा विषय ठरली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या प्रबुद्ध भारत या मीडिया हाऊसने एक ट्विट केले आहे. त्यात सूत्रांच्या माहिती आधारे उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा या निवासस्थानी मध्यरात्री भेट झाल्याचा दावा करण्यात आला आहे. पण या भेटीचा तपशील मात्र समोर येऊ शकला नाही. राज्यात पान 3 वर

# प्रभारी होताच डॉ. प्रितमताई मुंडे यांनी घेतली भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक

- कार्यकर्त्यांसोबत 'अल्पोपहार ते चाय पे चर्चा'

## प्रितमताईंच्या कार्यपद्धतीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह





संभाजीनगर. ( दि. 25 ) संभाजीनगर पश्चिम जिल्ह्याच्या भाजपच्या प्रभारी माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांची प्रभारीपदी नियुक्ती होताच त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. पश्चिम जिल्ह्यातील भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची त्यांनी अनौपचारीक बैठक घेतली आणि सर्वांशी संवाद साधला. पक्षासाठी तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना सन्मान मिळवून देण्यासह संघटन बळकट करण्यासाठी आपण ताकदीने काम करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

शहरातील जानकी हॉटेल येथे संभाजीनगर पश्चिम जिल्ह्यातील कन्नड विधानसभा, गंगापूर पान 3 वर

# आज ठळक

## शक्तिपीठ आता अट्टाहास केवळ एका 'देवा'च्या इच्छेसाठी – जयंत पाटील




सांगली : कोणताही देव जमिनी द्या आणि माझ्या दर्शनाला या असे सांगत नाही. मात्र शक्तिपीठाचा अट्टाहास केवळ एका 'देवा'च्या इच्छेसाठी महामार्गाबाबत सामान्य माणसाच्या भावना डावलल्या जात असल्याची टीका माजी मंत्री आमदार जयंत पाटील यांनी शनिवारी केली. शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्यावतीने आज ईश्वरपूर येथील राजारामबापू नाट्यगृहात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात आ. पाटील बोलत होते.

यावेळी ते म्हणाले, पूर्वी 802 किलोमीटर असलेला शक्तिपीठ महामार्ग आता 856 किलोमीटरपर्यंत वाढवण्यात आला आहे. लांबी वाढली, तसाच खर्चही वाढला. भराव टाकून रस्ता उभारण्याची योजना आहे. पण अशा रस्त्याची गुणवत्ता काय असेल, हे आपण पाहिलेलेच आहे. या प्रकल्पामुळे गावांची विभागणी होणार आहे. शेतीची विभागणी होणार आहे. जर शेतीची विभागणी झालीच तर आपल्याच शेतात जाण्यासाठी चार ते पाच किलोमीटरचा फेरा पडणार आहे. यामुळे शेती करणे कठीण तर होणार आहे.

महामार्गामुळे बाधित होणाऱ्यांना वाढीव मोबदला मिळेल, अशी हवा तयार केली जात आहे. यापासून सावध राहणं गरजेचं आहे. आमच्या वाळवा तालुक्यात पान 3 वर

## मोटारसायकल-कारचा भीषण अपघात; तरूणाचा मृत्यू



गेवराई : तालुक्यातील धोंडराई येथील प्रतिष्ठित नागरिक भारत मामा गुंजाळ यांचा तरुण मुलगा वैभव भारत गुंजाळ याचे आज अपघाती निधन झाले. या दुर्दैवी घटनेने धोंडराई गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.वैभव हा मोटारसायकलवरुन जात असताना गेवराई तालुक्यातील कुंभारवाडी जवळ गुरुवार, दि. 24 रोजी सकाळी 10 वाजण्याच्या सुमारास अपघात झाला. स्विफ्ट कारने धडक दिल्याने वैभव भारत गुंजाळ (वय 18) यांचे निधन झाले तर सोबत असलेल्या गेवराई तालुक्यातील सुशी येथील कृष्णा ज्ञानेश्वर जाधव (22) हे देखील जख्मी झाल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

अपघात अत्यंत भीषण होता, ज्यामध्ये वैभवला आपले प्राण गमवावे लागले. एक उमदा, मनमिळावू आणि कष्टाळू तरुण म्हणून वैभवची गावात ओळख होती. ऐन उमेदीच्या काळात काळाने त्याच्यावर झडप घातल्याने गुंजाळ परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.त्याच्या निधनाने एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा आधार हिरावला गेल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. वैभवच्या पश्चात त्याचे आई-वडील, भावंडे आणि मोठा परिवार आहे. वैभव भारत गुंजाळ याच्या पार्थिवावर गुरुवार, दि.24 एप्रिल रोजी रात्री उशिरा धोंडराईत शोकाकुल पान 3 वर

# पारदर्शक कारभाराचे आणखी एक पाऊल : परळी नगर परिषदेचे ठराव आता एका क्लिकवर

## ➲ सभेचा इतिवृतांत ऑनलाईन टाकणारी परळी वैजनाथ नगर परिषद ठरली पहिली




**महा युएलबी पोर्टलवर ऑनलाईन सुविधा उपलब्ध**

परळी वैजनाथ: प्रतिनिधी....

परळी वैजनाथ नगर परिषदेच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी आता एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नगर परिषदेच्या विविध सभांमध्ये मंजूर होणारे ठराव आता सर्व सन्माननीय नगरसेवक आणि नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत महा यु एल बी ( MahaULB) या संकेत स्थळावर ऑनलाईन पाहता येणार आहेत. यापूर्वी नगर परिषदेचे ठराव पाहण्यासाठी किंवा त्याची माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत होत्या. मात्र, आता डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत ही सर्व माहिती सार्वजनिक करण्यात आली आहे. अधिकृत संकेतस्थळावर इतिवृत्त प्रकाशित करणारी परळी वैजनाथ नगरपरिषद ही पहिली नगरपरिषद ठरली आहे.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्ष खैसर राजा खा पठाण, कार्यालयीन अधीक्षक संतोष रोडे, संगणक अभियंता लक्ष्मीकांत देशमुख, सभा व्यवस्थापन प्रमुख सत्यजित पिटके, सहाय्यक विक्रम स्वामी आदींनी या अधिकृत पोर्टलवर वेळोवेळी पान 3 वर

## वादग्रस्त विधानानंतर बागेश्वर बाबा अडचणीत? गुन्हा दाखल करण्याची वडेट्टीवार यांची मागणी



नागपूर : धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वक्तव्यावरुन राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या वक्तव्याचा तीव्र निषेध नोंदवत संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.धीरेंद्र शास्त्री यांनी सार्वजनिक मंचावरुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाबाबत केलेले वक्तव्य पान 3 वर

## जनगणना-2027 : 1 मे पासून सुरू होणाऱ्या जनगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभागी व्हावे - नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी







परळी वैजनाथ: प्रतिनिधी देशाच्या नियोजनाचा मुख्य आधार असलेली 'जनगणना-2027' सुरु होत आहे.1 मे पासून सुरु होणाऱ्या जनगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

जनगणना- 2027 च्या अनुषंगाने परळी वैजनाथ येथे तीन दिवसाचे पहिल्या बॅचचे प्रशिक्षण डॉ. भालचंद्र वाचनालय या ठिकाणी घेण्यात आले. जनगणना प्रगणक, व पर्यवेक्षकांच्या या प्रशिक्षणाचा समारोप झाला. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रशिक्षणार्थी प्रगनक व पर्यवेक्षकांशी संवाद साधत त्यांनी जनगणना पान 3 वर

## नगरपरिषदेने घेतलेले ठराव आता सर्वसामान्यांना ऑनलाईन पाहता येणार; नगराध्यक्षा व प्रशासनाचे आभार - अश्विन मोगरकर







परळी वैजनाथ परळी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेतील कामकाज इतिवृत्त व ठराव आता परळीकर जनतेला ऑनलाईन वाचायला मिळणार आहेत. भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी वारंवार प्रशासनासोबत याबाबतीत पाठपुरावा केला होता. ऑनलाईन इतिवृत्त व ठराव वाचण्यास ठेवल्याबद्दल परळी नगरपरिषद अध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी व प्रशासनाचे अश्विन मोगरकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीचा निकाला लागून चार महिने झाले आहेत. नगरपरिषदेचे कामकाज सुरळीतपणे चालू झाले आहे. या चार महिन्यांच्या काळात नप उपाध्यक्ष व पान 3 वर

## ज्ञानभारत प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ




बीड , दि.25 (जिमाका)- भारताच्या समृद्ध हस्तलिखित वारशाचे जतन, दस्तऐवजीकरण आणि डिजिटलायझेशन करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने "ज्ञानभारत (Gyan Bharatam)" प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला 16 मार्च 2026 पासून देशभरात प्रारंभ करण्यात आला आहे.

भारताला हस्तलिखितांचा मोठा आणि वैविध्यपूर्ण वारसा लाभलेला पान 3 वर

# ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामामुळे बीडमध्ये सकारात्मक परिवर्तन!

## अंजली व अनिश दमानिया यांचा दोन दिवशीय कृषीकुल दौऱ्यात प्रभावी सुसंवाद

## माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचीही भेट; शेती - मातीच्या विषयावर सखोल चर्चा



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

कधीकाळी तीव्र दुष्काळ, शेतीचे अपयश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यासाठी ओळखला जाणारा बीड जिल्हा आज हळूहळू सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. या परिवर्तनामागे ग्लोबल विकास ट्रस्टच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत कामाची मोठी भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. 2012 साली बीड जिल्ह्यात प्रथम दौरा केल्याच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, "त्या वेळी अनेक गावांमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती होती. पाण्याचा तीव्र दुष्काळ, शेती संकटात आणि गावात केवळ लहान मुले व वृद्धच दिसत असत. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या कामांमुळे आज या परिस्थितीत लक्षणीय बदल झालेला दिसतो."

त्या पुढे म्हणाल्या की, 2016 पासून माझे बंधू मयंक गांधी आणि संजय परमार यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे हा बदल शक्य झाला आहे. फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन, आधुनिक तांत्रिक मार्गदर्शन आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिलेला आधार यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. परिणामी, शेतीकडे पुन्हा ओढ निर्माण झाली असून जिल्ह्यातील स्थलांतरालाही आळा बसला आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे शेतीला पाणी उपलब्ध होणे ही या बदलाची सर्वात महत्त्वाची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या "कृषीकुल" प्रशिक्षण केंद्राला दिलेल्या दोन दिवसीय भेटीत अंजली दमानिया आणि त्यांचे पती अनिश पान 3 वर

# संपादकीय

## दुष्काळातील 'दौलत'!

पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धाचे ढग अजूनही गडद असताना, यंदाचा पावसाळा अंमळ अधिकच कोरडा जाणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दोन्हीचा एकत्रित परिणाम चिंतेचे मळभ दाट होण्यात आहे. युद्धामुळे तेलाबाबतची अनिश्चितता, आयात-निर्यातीचा खोळंबा आणि महागाईने डोके वर काढायला सुरुवात केलीच आहे. त्यात कमी पावसाच्या अंदाजाने पीकपाणीच नाही, तर पेयजलाच्या संकटाचीही चाहूल दिली आहे. युद्धाबाबत मध्यस्थी-दलाली वगैरे काहीच करणे हातात नाही हे वास्तव असताना निदान पाण्याच्या संकटाची किमान तयारी करणे तरी शक्य आहे. त्यासाठी आतापासूनच प्रयत्न केले नाहीत तर फक्त समस्याच कोसळणार आहेत, हे लक्षात ठेवलेले बरे. या संभाव्य संकटाची दखल घेणे आवश्यक.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने पावसाचा दीर्घकालीन अंदाज नुकताच जाहीर केला. त्यानुसार, देशात यंदा सरासरीच्या 92 टक्के पाऊस पडेल, अशी शक्यता आहे. हवामानशास्त्र विभाग 92 टक्के म्हणते, तेव्हा त्यात अधिक-उणे पाच टक्के गृहीत धरायचे असतात. अधिकचे पाच टक्के पदरात पडले, तर बरेच, पण प्रमाण उणावले, तर, म्हणून तयारी करणे गरजेचे. आपल्या पावसावर 'ला निना' आणि 'एल निनो' हे दोन घटक महत्त्वाचा परिणाम करतात. सोप्या भाषेत समजून घ्यायचे, तर 'ला निना' चांगल्या पावसासाठी पोषक आणि 'एल निनो' मारक. 'एल निनो'ची स्थिती असते, तेव्हा बहुतांश वेळा पाऊस सरासरीपेक्षा कमी पडतो. 'ला निना'चा प्रभाव गेली दोन वर्षे असल्याने पावसाने सरासरी गाठली, काही ठिकाणी तर तो अति बरसला. आत्ताचा विचार करायचा, तर 'ला निना'चा प्रभाव कमी होऊन स्थिती तटस्थ आहे. पण हवामानशास्त्र विभागाच्या अंदाजानुसार जूननंतर 'एल निनो'चा प्रभाव वाढेल. तो मान्सूनला पूरक नाही. असाच अंदाज 'स्कायमेट' या खासगी हवामानशास्त्र संस्थेने दिलेला असल्याने यंदा पाऊस कमी बरसेल, याची शक्यता वाढते. शिवाय यंदाची स्थिती अधिक काळजी करण्यासारखी, कारण हवामानशास्त्र विभागाने दिलेला 92 टक्के पावसाचा अंदाज हा गेल्या सुमारे तीन दशकांतील सर्वांत कमी आहे. तयारी या संदर्भाने अधिक करणे गरजेचे. गेल्या तीन दशकांत वाढलेले शहरीकरण, त्यातील वाढती लोकसंख्या आणि महापालिकांना राज्यातील कोणत्याच शहरात नीट पुरवता येऊ न शकणारे पिण्याचे पाणी अशा स्थितीत कमी पावसामुळे साठाच कमी उरला, तर भीषण स्थिती उद्भवू शकते. पुणे, मुंबई, ठाणे यांसारख्या शहरांत नव्याने विकसित झालेल्या भागांतील मोठमोठ्या इमारतींना आत्ताही पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. पाणी वितरणातील ढिसाळपणा याला कारणीभूत आहेच. पण साठाच कमी असेल तेव्हा या टँकरची गरज जलवाहिन्यांद्वारे नीट पाणी येणाऱ्या भागांनाही लागते. अशा संकटात कशी नफेखोरी होऊ शकते आणि त्यामुळे सामान्य माणूस कसा नाडला जाऊ शकतो, हे नव्याने समजावून सांगण्याची गरज नाही.

महाराष्ट्रातील अनेक धरणे शेतीच्या सिंचनासाठीही पाणी पुरवतात. पण पाण्याच्या दुर्भिक्षाच्या वेळी पिण्याचे पाणी राखून ठेवण्यास प्राधान्य दिले जात असल्याने कमी पावसाच्या अंदाजाचे शेतीवरही गंभीर परिणाम संभवतात. उसासारख्या नगदी पिकांचे यामुळे होऊ शकणारे नुकसान कृषी अर्थचक्राला खीळ घालणारे असू शकते. आधीच साखर निर्यातीवर परिणाम झालेला असताना, उत्पादनाला बसू शकणारी खीळ अडचणींत भर घालणारीच असेल. सध्या महाराष्ट्रातील धरणांत गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक जलसाठा आहे. त्याचे नियोजन हेच आत्ताचे तातडीचे प्राधान्य आहे. हवामानशास्त्र विभाग मान्सूनचा सुधारित अंदाज मेअखेरीस जाहीर करील. तेव्हा काही बदल होतात का, ते बघायचे. आत्ताच्या अंदाजात त्यातल्या त्यात एक दिलासादायक बाब म्हणजे मान्सूनच्या उत्तरकाळात इंडियन ओशन डायपोल अर्थात 'आयओडी'ची स्थिती सकारात्मक असेल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. 'आयओडी' म्हणजे हिंदी महासागराच्या पूर्व आणि पश्चिम सागरी पृष्ठभागांवरील तापमानातील फरक. पश्चिमेकडील सागरी पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त असते, तेव्हा आयओडी सकारात्मक असे म्हटले जाते. त्याचा चांगल्या पावसाला उपयोग होतो. पण, हा प्रभाव उत्तरकाळात दिसणार असल्याने त्याचा पेरण्या आदींना कितपत उपयोग होईल, हे स्पष्ट झालेले नाही. आणि तसा तो खरोखरच सकारात्मक होणार असेल तर मोसमी पावसाच्या पहिल्या टप्प्यात करायचे काय, हा प्रश्न.तो पडण्याचे सयुक्तिक कारण म्हणजे या संभाव्य संकटास सामोरे जाण्याची इच्छा आपल्या राज्यकर्त्यांत तूर्त तरी दिसत नाही. कदाचित पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका, नारीशक्ती वंदन इत्यादी अधिक महत्त्वाची व्यवधाने असल्यामुळे असेल पण हे हवामानाचे संकट आपल्या राज्यकर्त्यांच्या प्राधान्यक्रमावर नसावे. तसेही पर्यावरण हा राजकीयदृष्ट्या मतांची बेगमी करण्यास मदत करणारा विषय नाही. हे कटू असले तरी सत्य. ज्यांस ते अविश्वसनीय भासते त्यांनी आपल्या राजधानी दिल्लीत हिवाळ्यात उद्भवणाऱ्या परिस्थितीचे उदाहरण स्मरावे. वास्तविक नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे त्यानंतर हिवाळ्याचे येणेही नेमेचि म्हणावे असेच. तरीही नेमेचि कोसळणाऱ्या पावसामुळे मुंबईत नेमेचि खड्डे पडतात आणि नेहमीच्याच कंत्राटदारांस बेगमीची संधी मिळते. तसेच दिल्लीत हिवाळ्यात हवा प्रदूषित होऊन अनेकांचे छातीचे पिंजरे होतात. पण प्रदूषण रोखण्यासाठी, निदान ते कमी व्हावे यासाठी तरी प्रतिबंधात्मक उपाय योजावेत असे काही आपल्या राज्यकर्त्यांस वाटत नाही.

याचे कारण पर्यावरण रक्षणाचे उपाय जरी योजले तरी त्याची फलनिष्पत्ती संबंधितांस अनुभवास येण्यासाठी काही काळ द्यावा लागतो. पर्यावरण रक्षण उपाय हे वृक्ष लागवडीसारखे असतात. वृक्ष लागवड करणाऱ्यांस त्या वृक्षाची फळे चाखण्यास मिळतीलच असे नाही. पण म्हणून वृक्ष लागवड करणे जसे थांबवायचे नसते तसेच पर्यावरण रक्षणासाठी उपाययोजना करणे टाळायचे नसते. या संदर्भात एके काळी जगातील अत्यंत प्रदूषित गणल्या जाणाऱ्या चीनच्या बीजिंगने वातावरणशुद्धी कशी केली ते शिकण्यासारखे आहे. पण तसे आपण शिकू याची शाश्वती शून्य.आगामी दुष्काळाबाबत असेच होण्याचा धोका संभवतो. वास्तविक अशी दुष्काळ शक्यता हवामानाचा ताजा अंदाज सूचित करतो. पण तरीही आपल्या यंत्रणा खरोखरच असा दुष्काळ पडला तर त्याचा परिणाम सुसह्य व्हावा यासाठी उपाययोजना करतीलच याची शाश्वती नाही. निदान आपला इतिहास हेच दर्शवतो. अन्यथा पाण्याचे नियोजन, उद्योग/शेती आणि नागरिकांत त्याची वाटणी समन्यायी व्हावी यासाठी आतापासूनच प्रयत्न हाती घ्यायला हवेत. पाऊस ओढ देणार असेल तर शेतकऱ्यांच्या पीक पद्धतीत काही बदल शक्य आहेत का याचीही चाचपणी केली जाणे गरजेचे आहे.

# आमचं आपलं इंग्लीश फिंग्लीश

डॉ. दशरथ भोसले



प्रस्तावना

इंग्रजी ही भाषा आजच्या काळात प्रगतीचे साधन मानली जाते, पण तिच्याभोवती एक वेगळीच भीती आणि आकर्षण निर्माण झाले आहे. ग्रामीण आणि शहरी जीवनातील भाषिक दरी अनेकदा विनोदी प्रसंग घडवते. "आमचं आपलं इंग्लीश फिंग्लीश" हा लेख अशाच वास्तवाला हलक्याफुलक्या शैलीत मांडतो. एका सामान्य माणसाच्या आयुष्यातील अनुभवातून इंग्रजी शिकण्याचा प्रवास उलगडतो. या प्रवासात चुका, गैरसमज आणि प्रयत्न यांचे सुंदर चित्रण दिसते.

 विनोदी कथा

श्री. सदाशिव राणे मुंबईला कुठल्याशा सरकारी कार्यालयात कारकून म्हणून नोकरीस होते. श्री. राणेंना दोन मुले होती. थोरला मुलगा विजय आयटी इंजिनियर झाला. लग्न झाले आणि तो पुण्याला स्थायीक झाला आहे. दुसरे अपत्य म्हणजे विनीता ही मुलगी. विनीता आयटी इंजिनियर झाली. लग्न झाले आणि ती आता पुण्यात स्थायीक झाली आहे. श्री. सदाशिव राणे यांची भायखळ्याला चाळीत एक स्वतःची खोली होती. पुढे रीडेव्हलपमेंटमध्ये त्यांना वन बीएचके ब्लॉक त्याच जागेवर मिळाला.

निवृत्तीनंतर श्री. राणे उभयता मालवणला स्थायीक झाले. वडीलोपार्जित घर त्यांनी सुधारणा करून अपटूडेट केले. घराभोवती आंबे, शेवगा, रातांबे, नारळ, पोफळीची झाडे होती. गावातून बारमाही दुथडी भरुन वाहणारी नदी. परसदारीची ताजी भाजी, नदीचे मासे, खेकडे—राणे उभयता गावाकडे मस्त रमले होते. श्री. सदाशिव राणे यांना ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. मुंबईच्या खोलीची त्यांना गरज वाटत नसल्याने त्यांनी ती खोली विकली. आलेला पैसा बँकेत ठेवला. मुलांना हे कळताच दोन्ही मुले वडिलांवर चिडली. आपल्या वडिलांनी आम्हाला विश्वासात न घेता खोली विकली. आलेला पैसा आम्हा दोघा मुलांना न देता बँकेत ठेवला. तेव्हापासून मुले वडिलांपासून दूर झाली. सुटीत गावी येणे बंद केले. नाही म्हणायला विजयचा मुलगा विनय कधी तरी गावी आजी-आजोबांना फोन करायचा. विनय आता इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दुसरीत शिकत होता.

श्री. सदाशिव राणे उभयतांनी वकिलांना बोलावून मृत्यूपत्र तयार केले. मृत्युपत्रात त्यांचा सर्व बँक बॅलन्स त्यांनी विनयच्या नावाने केला. पत्नीचे सर्व दागिने मुलीच्या नावाने केले. गावाकडील घर, जमीन, जायदाद दोन्ही मुलांना समसमान मिळाव्यात, असे मृत्यूपत्रात नमूद केले. गावातील कोणीतरी खोडसाळपणे सदाशिव राणेंच्या मुलांना सांगितले—तुमचे वडील त्यांची सर्व प्रॉपर्टी, जमीन-जुमला गावातील शाळेला दान करणार आहेत. मुलांनी खातरजमा न करता वडिलांशी संबंध तोडले होते. परंतु आता वडिलांच्या मृत्यूपत्रातील मजकूर समजल्याने मुलांचे आई-वडिलांप्रती प्रेम उफाळून आले. श्री. विजयने आई-वडिलांना स्वतःच्या गाडीने पुण्याला आणले. विजयचा संसार पाहून राणे उभयता खुश झाले. संध्याकाळी त्यांचा नातू विनीत शाळेतून आला. आपल्या आजी-आजोबांना प्रेमाने मिठी मारली.

रात्री जेवणे झाल्यावर सदाशिव राणेंना आपल्याला किती इंग्रजी येते हे दाखवण्यासाठी नातवाला मांडीवर घेतले आणि "मी पाढे म्हणून दाखवतो" असे नातवाला सांगताच नातू म्हणाला, "आजोबा, इंग्रजीत पाढे न म्हणता टेबल म्हणतात, आणि आजोबा तुम्ही 'सेव्हन' चा उच्चार 'जेवण' केल्यासारखा करता." नातवाने आजोबांना इंग्रजी उच्चार कसे असतात, याचे एक लेक्चरच दिले.

श्री. सदाशिव राणेंना आठवले—साधारणतः 1954-55 चा काळ असावा. माझ्या मामाने मला शिक्षणासाठी पुण्यात आणले. म्युनिसिपालिटीच्या शाळेत सातवीपर्यंत मराठी माध्यमातून शिक्षण झाले. शासनाने पाचवीपासून इंग्रजी विषय सुरु केला. पाचवी, सहावीला कोणीही शिक्षक इंग्रजी विषय शिकवायला नव्हते. सातवीत असताना तिमाहीनंतर इंग्रजी विषयासाठी शिक्षिका आल्या.

ज्यांचे पालक सुशिक्षित होते, त्या मुलांना इंग्रजी येत होते. आम्ही अडाणी आई-बापाची मुले. ज्या मुलांना इंग्रजी येत होते, त्यांना विचारुन आम्ही आमच्या इंग्रजी पुस्तकात मराठीत पेन्सिलने लिहायचो. मॅडमने वाचायला सांगितले की, आम्ही मराठीतून लिहिलेले इंग्रजी वाक्य जोरात बोलायचो. मॅडमना शंका यायची, मग त्या आमचे पुस्तक बघायच्या. इंग्रजी वाक्ये मराठीत लिहिलेली बघून मॅडम आमच्या मांड्या छडीने फोडायच्या. त्यांची शिक्षा देण्याची पद्धत आमच्या मांड्या छडीने फोडणे हीच होती. मॅडम बाळंतपणाच्या रजेवर गेल्या. वार्षिक परीक्षेत काही न येणाऱ्या सदाशिवच्या प्रगती पुस्तकात इंग्रजी विषयात पासष्ट मार्क्स आले आणि हायस्कूलला लगेच प्रवेश मिळाला.

आठवीला भारत रीडर पुस्तक होते. माझ्याप्रमाणे सिंहगड परिसरातील कोंढवे घावडे, कोंढवे बुद्रुक येथील मुले होती. आम्हाला साधी एबीसीडीही येत नव्हती, मग आम्ही सर्वांनी इंग्रजी विषयाच्या शिक्षकांना आमची अडचण सांगितली. सरांनी आम्हा विद्यार्थ्यांना शाळा सुटल्यावर काही दिवस जादा वेळेत एबीसीडीपासून व्याकरण, वाक्यरचना वगैरे शिकवले. पण सगळे आमच्या डोक्यावरुन गेले. तेव्हापासून आमच्या इंग्रजीचा पाया कच्चाच राहिला.

ऑफिसमधील आमच्या लोकांचे इंग्रजी बघून साहेब लोक त्यांच्या डोक्याला हात लावून घेत. एकदा सदाशिवला ताप आला. त्याने रजेचा अर्ज पाठवला—

"सर, टुडे आय ॲम ऑन हिट सो आय वुईल नॉट कम इन माय ऑफिस. प्लीज गिव्ह मी लिव्ह."

एका कर्मचाऱ्याचे डोळे आले होते. त्याने ऑफिसला इंग्रजीत अर्ज पाठवला—

"माय आइज आर कमिंग, सो आय वुईल नॉट कम इन ऑफिस. हेन्स प्लीज गिव्ह मी टू डेज लिव्ह."

सदाशिवला आता ऑफिसमध्ये प्रमोशन मिळाले होते. एकदा लेट कमर क्लार्कने सदाशिवला "येऊ का?" असे विचारले. सदाशिव राणे ओरडले—"यू एंट्री एंट्री, आदरवाईज डिसेंट्री." सगळेजण हसत होते.

श्री. सदाशिव राणे पुण्यात असताना त्यांच्या वाचनात एक जाहिरात आली—दोन महिन्यांत फाडफाड इंग्लिश बोलायला शिका. सदाशिव राणे यांनी लगेच दोन हजार फी भरली. नातवाला सांगितले, "बघ, दोन महिन्यांनी मीसुद्धा तुझ्यासारखा फाडफाड इंग्लिश बोलणार." सदाशिव राणे क्लासला गेले. पहिल्या दिवशी क्लास मालकांनी परदेशी माणसासारखे स्पीडने इंग्रजी बोलून दाखवले. दोन महिन्यांनी तुम्हीसुद्धा युरोपियन माणसाप्रमाणे इंग्रजी बोलणार, असे सांगितले. दोन महिने झाले, पण आमच्यापैकी एकालाही साधे इंग्रजी बोलता येत नव्हते. आमची फसवणूक झाली होती. सर्वांनी टीचरला विचारले—आम्हाला इंग्रजी बोलता येत नाही. टीचरने सर्वांना एकच प्रश्न विचारला—"व्हॉट इज युवर नेम?" तुम्ही बरोबर उत्तर दिले, म्हणजे तुम्हाला इंग्रजी येते. घरी प्रॅक्टिस करा. कसले फाडफाड इंग्लिश! साधे मोडके-तोडके इंग्रजीही बोलू शकलो नाही.

सदाशिवरावांना नातवाने सांगितले, "आजोबा, आता मी तुम्हाला इंग्रजी बोलायला शिकवणार. तुम्ही रोज माझ्याबरोबर इंग्रजीतून बोलायची प्रॅक्टिस करा." आणि आश्चर्य घडले—सहा महिन्यांनंतर सदाशिव राणे चांगल्या प्रकारे इंग्रजी बोलू लागले.

चार दिवसांनी इंग्रजी कल्चर दाखवण्यासाठी त्यांच्या सुनबाईंनी सांगितले—"डॅड, आज समथिंग फेस्टिवल आहे." सदाशिव राणे यांनी प्रश्नार्थक मुद्रेने सुनबाईकडे बघितले. सुनबाई पुढे बोलल्या—"दॅट दॅट ते हे आपलं. दॅट ते थ्रेड वाइंडअप करायचं दॅट ट्री." सुनबाईंचे वटपौर्णिमेचे इंग्रजीतून केलेले वर्णन ऐकून हसावे की रडावे, हेच कळेना.

सदाशिव राणेंच्या जीवनातील तो प्रसंग आठवला की आजही त्यांना हसू अनावर होते. त्याचे असे झाले की, त्यांच्या ऑफिसला एक वयस्कर स्वातंत्र्यसैनिक आणि माजी राज्यमंत्री आले. त्यांनी ऑफिसच्या स्टेनोग्राफरला बोलावले आणि काही इंग्रजी पत्रे महाराष्ट्र शासनाला देण्यासाठी डिक्टेट केली. स्टेनोग्राफरने पत्रे टाईप करून आपल्या बॉसकडे दिली. बॉस छाती ताठ करुन ती पत्रे स्वातंत्र्यसैनिक साहेबांसमोर सहीसाठी ठेवली. पत्र बघताच स्वातंत्र्यसैनिक भडकले. त्यांचा रुद्रावतार बघून त्यांच्या मित्राने पत्र हातात घेतले. मित्राने बॉसला म्हटले, "साहेब, तुम्ही 'आय' घातली नाही. साहेब, तुम्ही शेवटी 'आय' घातली असती तर साहेब एवढे रागावले नसते. 'आय घालणे' ही एक शिवी आहे." बॉस गोंधळला. इंग्रजीत पत्र टाईप केले होते. 'MUMBA' पुढे 'I' अक्षर टाईप न झाल्याने मुंबईचा उच्चार 'मुंबा' असा झाला होता. बॉसला "आय घालणे" यासाठी आयुष्यभराचा धडा मिळाला होता.

 समारोप

या कथेतून एक गोष्ट स्पष्ट होते की, भाषा ही केवळ दिखाव्यासाठी नसून संवादासाठी असते. इंग्रजी येणे महत्त्वाचे असले तरी ते आत्मविश्वासाने आणि सरावानेच आत्मसात होते. चुकीच्या पद्धतीने शिकण्यापेक्षा सातत्यपूर्ण प्रयत्न अधिक परिणामकारक ठरतात. विनोदातून दिलेला हा संदेश प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. शेवटी, "इंग्लीश फिंग्लीश" पेक्षा संवाद आणि समज अधिक महत्त्वाची आहे.

**डॉ. दशरथ भोसले, विनोदी कथा लेखक, दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# अनुसूचित जातीचे आरक्षण आणि उपवर्गीकरण

सर्वोच्च न्यायालय यांनी आरक्षण संदर्भात निकाल देतांना म्हटले की,आरक्षण ज्या जातींना मिळाले आहे आणि जे वंचीत आहेत.अशा लोकांना त्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या हेतूने आरक्षणातून उपवर्गीकरण होण्या संदर्भात सात बेंच असलेल्या न्यायाधीश यांनी एका बाजूला सहा आणि दुसऱ्या बाजूला एक असा निकाल दिला. आणि सर्व राज्यांना तशी शहानिशा करून अंमलबजावणी करण्याचे सांगीतले होते. त्यामुळे काही ठिकाणी अंमल बजावणी करण्यासाठी प्रक्रिया चालू केलेली आहे. आपण जर आरक्षण संदर्भात विचार केला तर लक्षात येईल की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवर्ग तयार केले आहे.म्हणजे ओबीसी चा प्रवर्ग,एस सी चा प्रवर्ग आणि एस टी चा प्रवर्ग असा प्रवर्ग तयार केलेला आहे. या प्रवर्गा मुळे सर्वांना सारखे आरक्षण दिलेले आहे.समजा एस सी प्रवर्गात दहा जागा निघाल्या असतील तर त्यामध्ये एकोणसाठ जाती असल्यामुळे त्या निघालेल्या जागा सर्वांसाठी आहेत. म्हणजे अनुसूचित जाती मधील सर्व जातीसाठी आहे.आणि त्या समान पातळीवर आहे.याचा अर्थ एकोणसाठ जाती साठी आहे.जी उमेदवार ही सर्वात परीक्षेत मार्क जास्त घेतील मग तो एकोणसाठ मधील कोणत्याही जातीचा असो त्याला सिलेक्शन करण्यात येते. महार जात ही 37 क्रमांक वर येते तीही जातीची मुले या परीक्षेत बसतात,अंत्यन्त परिश्रम घेऊन मेरिट येतात आणि परिश्रमाणे नोकरी मिळवितात. खरं तर मग या महार समाजाने मांग,मादगी यांचे आरक्षण किंवा जागा घेतल्या कशा,जागा तर या एस सी प्रवर्गा साठी होत्या. ही बाब मांग,मादगी आणि इतर समाजाने समजून घेण्याची गरज आहे.

खरं तर अनुसूचित जातीमधील अनेक जागा अनेक कार्यालयात रिक्त आहेत.त्याचा अनुशेष अजूनही भरला गेला नाही.कंत्राटी पद्धतीने अनेक ठिकाणी काम सुरु आहे. पंचायत समिती मध्ये असेल, जिल्हा परिषद मध्ये असतील, किंवा तहसील कार्यालयात असतील, किंवा वीज निर्मिती मध्ये असतील,या ठिकाणी असलेल्या जागा म्हणजे कंत्राटी पद्धतीने होत असलेले काम थांबवून नियमित अनुसूचित जातीतील बेरोजगार यांना भरती करून भरण्यात याव्यात अशी मागणी न करता,मांग,मादगी मधील काही जर महार समाजातील लोकांनी आमच्या जागा बळकावल्या असा आरोप करीत असतील तर ते चुकीचे आहे.अज्ञान आहे. म्हणजे जागा या एस सी प्रवर्गातील निघत असल्यामुळे आणि त्यात सर्व जातीतील लोकांना फार्म भरण्याची मुभा असल्याने महार समाजांनी आमच्या जागा घेतल्या असा आरोप करणे आणि इतरही लोकांच्या मनात या महार समाजबद्दल द्वेष निर्माण करणे,पसरविणे योग्य नाही. एस सी प्रवर्गातील जाती, जातीत भांडणे लावण्याचा तो प्रकार आहे. एक संघ असलेल्या प्रवर्गातील लोकांमध्ये फूट निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबीसी प्रवर्गातील असो या एस सी प्रवर्गातील असो या एस टी प्रवर्गातील असो यांना समान अधिकार दिले आहे. त्यामुळे कोणाची प्रगती झाली, कोणाची झाली नाही याला कोणतीही जात दोषी नाही तर ते आपले अज्ञान कारणीभूत आहे.हे समजून घेण्याची गरज आहे.प्रगती पासून कोणीही वंचीत असता कामा नये यासाठी च संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवर्ग तयार केला आहे आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली आहे.श्रीमंत आणि उच्च वर्णीय तुमच्या मधील विभागणी मुळे अन्याय करतील ही जाणीव संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना होती.संविधान अंमल बजावणीच्या 75 वर्षात देखील संविधान मध्ये आरक्षणाची तरतूद असतांना देखील शासनात असणाऱ्यांनी आरक्षण पूर्ण भरुन काढले नाही आणि ओबीसी,एस सी,एस टी,प्रवर्गातील लोकांना पाहिजे त्या प्रमाणात आपला मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्य पाहिजे त्या प्रमाणात न समजल्या मुळे आता पर्यंत अनुशेष भरला गेला नाही आणि कंत्राटी पद्धत जोर धरु लागली आहे.ही बाब जेवढ्या लवकर हा मागासवर्गीय समाज आणि इतर मागासवर्गीय समाज समजेल आणि योग्य दिशेने वाटचाल करून आपला हक्क आणि अधिकार मिळवून घेण्यास सज्ज होईल तेव्हा प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. हे समजणे काळाची गरज आहे.

बदर समितीने काय अहवाल शासनाकडे सादर केला तो जाहीर न झाल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात आप,आपले मत मांडणे कठीण आहे. पण एक मात्र निश्चित म्हणता येईल कोणीही कोणाच्या जागा बळकावल्या नाही. कारण ओबीसी, एस सी, आणि एस टी, एन टी, या प्रवर्गाच्या जागा निघतात, जातीच्या नाही, जसे मादगी, मांग, चांभार, भंगी, महार अशा जातीच्या जागा आज पर्यंत कधीही निघालेल्या नाही.त्यामुळे या जातीने आमच्या जागा घेतल्या हे म्हणणे म्हणजे जाणूनबुजून त्या जातीला टार्गेट करून इतर जातीच्या मनात द्वेष पसरविण्याचा प्रयत्न आहे. एक संघ असणाऱ्या प्रवर्गाला तोडण्याचा प्रयत्न आहे. जर एस सी प्रवर्गातील तीस जातीच्या लोकांनी उपवर्गीकरन व्हावे अशी मागणी असती तर ठीक आहे. केवळ एक, दोन जाती म्हणत असतील आणि त्याच्या म्हणण्या नुसार उपवर्गीकरन होत असेल तर ते योग्य नाही.सर्वोच न्यायालयाने जो निर्णय दिला आहे. त्यात सरकारने योग्य त्या संदर्भात ज्यांचा विकास झाला नाही त्या बाबतीत पावले उचलावी असे सांगितले आहे. त्या दृष्टीने सरकारने योग्य ती पावले उचलावी आणि सर्व बाबतीत आरक्षण दिले गेले आहे अशा सर्वांना समान मिळायला हवे असे प्रयत्न करायला हवेत. तर योग्य न्याय मिळेल. खरं तर समान न्याय मिळावे यासाठी संविधान शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवर्ग तयार केला आहे. मग तो ओबीसी चा असेल या एस,सी चा असेल या एस, टी चा असेल या एन, टी चा असेल हे समजून घेण्याची गरज आहे. आणि जे अभ्यासू आहेत त्यानी वास्तव समजून सांगण्याची गरज आहे. तरच भारतीय समाज एकसंघ राहू शकेल आणि सर्वांना समान न्याय मिळेल.तेव्हा खऱ्या अर्थाने *"अनुसूचित जातीचे आरक्षण आणि उपवर्गीकरन"* संदर्भात आम्हाला समजले असे होईल. आपण कशाप्रकारे समजून घेतो त्यावर सारे अवलंबून आहे.त्यातच सर्वांचे हित आहे.



**अविनाश टिपले - 9970917389,चंद्रपूर.**

# यशाचे शिखर! सरस्वती कन्या प्रशालेची विद्यार्थिनी गार्गी गवळीची 'एन.एम.एम.एस.' शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी

## ➡ केजच्या शिरपेचात मानाचा तुरा; मुख्याध्यापिका व शिक्षक वृंदाकडून गार्गीवर कौतुकाचा वर्षाव

प्रकाश मुंडे | केज तालुका प्रतिनिधी केज येथील माऊली विद्यापीठ संचलित सरस्वती कन्या प्रशालेची गुणवंत विद्यार्थिनी कु. गार्गी तात्या गवळी हिने एन.एम.एम.एस. (NMMS) परीक्षेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. गार्गीच्या या दैदिप्यमान यशामुळे तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

यशाचा प्रवास:

सन 2025-26 ची एन.एम.एम.एस. परीक्षा 28 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल 24 फेब्रुवारी 2026 रोजी जाहीर झाला होता, तर बहुप्रतीक्षित अंतिम निवड यादी 24 एप्रिल 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत गार्गीने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर स्थान निश्चित केले आहे.





मार्गदर्शनाची मोलाची साथ:

गार्गीच्या या यशामागे सरस्वती कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती डोंगरे मॅडम यांचे कुशल नेतृत्व आणि सर्व मार्गदर्शक शिक्षक वृंदाचे कठोर परिश्रम आहेत. शिक्षकांच्या योग्य दिशादर्शनामुळेच गार्गी इथपर्यंत पोहोचू शकली, अशी कृतज्ञता तिचे वडील तथा पत्रकार आयु. तात्या गवळी यांनी व्यक्त केली आहे.

"शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि गार्गीची जिद्द यामुळेच हे यश शक्य झाले. शाळेने घेतलेली मेहनत खरोखरच कौतुकास्पद आहे."

— तात्या गवळी (पालक)

सर्वत्र कौतुक:

गार्गीच्या या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि केज परिसरातील नागरिकांनी तिचे अभिनंदन केले आहे. गार्गीच्या या यशामुळे ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला आणि जिद्दीला एक नवी उभारी मिळाली असून, तिच्यावर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

# केज नगरपंचायत हादरली! 4.24 कोटींचा घरकुल घोटाळा; तत्कालीन मुख्याधिकाऱ्यासह 6 जणांवर गुन्हा दाखल

प्रकाश मुंडे / केज तालुका प्रतिनिधी गोरगरिबांच्या हक्काच्या घरांवर डल्ला मारणाऱ्या केज नगरपंचायतीमधील एका मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा अखेर पर्दाफाश झाला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेचा तब्बल 4 कोटी 24 लाख 73 हजार 23 रुपयांचा निधी परस्पर इतर खात्यांवर वळवून अपहार केल्याप्रकरणी तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत यांच्यासह 6 जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




नेमके प्रकरण काय?

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र आणि राज्य शासनाकडून प्राप्त झालेला निधी केवळ पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक होते. मात्र, 20 मे 2021 ते 31 जानेवारी 2022 या कालावधीत तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत यांनी पदाचा दुरुपयोग करत, लेखापाल आणि इतर कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हा कोट्यवधींचा निधी नियमबाह्य पद्धतीने लाभार्थ्यांऐवजी इतर खात्यांवर वर्ग केला.

चौकशीअंती घोटाळा उघड

या प्रकरणाची तक्रार प्राप्त होताच बीड जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेतली होती. उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीने सखोल तपासणी करून आपला अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला. या अहवालात धक्कादायक बाबी समोर आल्या:

कोणतेही शासकीय निर्देश नसताना नियमबाह्यरीत्या रक्कम वर्ग केली गेली.

केलेल्या अपहाराचा पुरावा नष्ट करण्यासाठी शासकीय कागदपत्रे आणि दस्तावेज गहाळ करण्यात आले.

यांच्यावर झाला गुन्हा दाखल

पान 3 वर

# सदृढ युवकच देश घडवतात, हनुमान व्यायाम शाळेच्या उन्हाळी संस्कार शिबीराच्या माध्यमातून सदृढ युवक तयार होतात... प्रा प्रदीप जी देशमुख



परळी वैजनाथ दि.24 (प्रतिनिधी) सदृढ युवकच देश घडवतात, हनुमान व्यायाम शाळेच्या उन्हाळी संस्कार शिबीराच्या माध्यमातून सदृढ युवक तयार होतात असे प्रतिपादन प्रा प्रदीप जी देशमुख

यांनी केले. ते येथील हनुमान व्यायाम शाळेच्या उन्हाळी संस्कार शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते.

शहरातील स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन करण्यात आलेल्या श्री हनुमान व्यायाम शाळेच्या माध्यमातून गेल्या 36 वर्षांपासून उन्हाळी संस्कार शिबीराचे आयोजन करण्यात येते. यंदा 37 व्या शिबीराचे उद्घाटन श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त प्रा प्रदिपजी देशमुख यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यनाथ बँकेचे संचालक विजय सेठ वाकेकर, प्रमुख पाहुणे वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे जेष्ठ विश्वस्त नागनाथराव देशमुख, लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रवींद्र देशमुख, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, दै. दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी धनंजय आढाव, पत्रकार प्रा प्रविण फुटके डॉ.हरिचंद्र वंगे दादा वैद्यनाथ कॉलेज पान 3 वर

# टाकळीत उडणार धुरळा! 'रानोबा केसरी'चा थरार रंगणार; आ. नमिताताई मुंदडा यांची विशेष उपस्थिती!



प्रकाश मुंडे / केज तालुका प्रतिनिधी ग्रामीण संस्कृतीचा कणा आणि शौर्याचे प्रतीक असलेली बैलगाडा शर्यत आता टाकळी (केज) नगरीत थरार निर्माण करण्यास सज्ज झाली आहे. ग्रामदैवत श्री रानोबा यात्रेनिमित्त 'पर्व 4 थे' अंतर्गत भव्य 'रानोबा केसरी' ओपन बैलगाडा शर्यतीचे जंगी आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, 27 एप्रिल 2026 रोजी सकाळी 8:30 वाजल्यापासून टाकळीच्या मैदानात हा 'नाद' घुमणार आहे.

बक्षिसांचा पाऊस: 41 हजारांसह मानाची ढाल!

या स्पर्धेत विजेत्यांना एकूण सात क्रमांकापर्यंत भरघोस बक्षिसे दिली जाणार आहेत:

प्रथम क्रमांक: ₹41,000 व 2 मानाच्या ढाली (सौजन्य: आ. नमिताताई अक्षय मुंदडा),

द्वितीय क्रमांक: ₹31,000 व 2 मानाच्या ढाली (सौजन्य: सुरज रामकृष्ण घुले),

तृतीय क्रमांक: ₹21,000 व 2 मानाच्या ढाली (सौजन्य: विष्णू जीवन राख),

(याव्यतिरिक्त 7 व्या क्रमांकापर्यंत रोख बक्षिसे व ढालींचे वितरण केले जाईल.)

पान 3 वर

# टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार. --वसंत मुंडे

परळी (प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील आजी माझी कृषिमंत्र्यांनी व कृषी अधिकाऱ्यांनी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याचा पिक विम्याचा प्रश्न प्रलंबित पडल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्यांनी जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय अनेक पुराव्यासहीत लेखी तक्रारी शासनाकडे दाखल करून उच्च न्यायालयापर्यंत



विविध जिल्ह्यातील पिक विमा संदर्भात शासनाला व पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्याचे पैसे त्वरित खात्यात वर्ग करण्याचे आदेश देऊनही कारवाई केली जात नाही. आर एस एस च्या विचारधारेचे केंद्रातील भाजप सरकार यांनी 2016 पासून पिक विमा संदर्भात खाजगीकरण केले त्यामुळे शेतकऱ्याचा मोठ्या प्रमाणावर पिक विमा मिळण्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. 2020 पासून आज पर्यंत खाजगी पिक विमा कंपन्याकडून कृषीचे प्रशासकीय अधिकारी आजी माजी मंत्री यांनी सर्व कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला विमा मिळत नाही. प्रधानमंत्री पान 3 वर

# निदेशकपदी नियुक्तीबद्दल शुभम फुटके यांचा तेली युवक संघटनेच्या वतीने सत्कार



परळी वैजनाथ दि.25 (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात निदेशक पदी नियुक्ती झाल्याबद्दल शुभम शांतलिंगआप्पा फुटके यांचा येथील तेली युवक संघटनेच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शुभम फुटके यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी मिळवलेले हे पान 3 वर

# आ.संजय गायकवाड, बागेश्वर बाबा प्रकरणी कारवाईची मागणी-कॉ.अजय बुरांडे

## ➡ अर्वाच्य भाषा वापरुन लोकशाहीची गळचेपी हीच संस्कृती का? - माकप



परळी / प्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास जनतेसमोर आणणाऱ्या कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे संपादक प्रशांत अंबी यांना अत्यंत वाईटरित्या शिवीगाळ करत धमक्या दिल्या. माता भगिनी वरून त्यांनी वापरलेली भाषा कोणत्याही सभ्य माणसाला सहन होणार नाही अशी आहे. आमदार संजय गायकवाड यांचा व त्यांच्या पक्षाचा देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला पाठिंबा आहे.लोकशाही मध्ये व्यक्त होणाऱ्या व्यक्तीला अशा पद्धतीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देणे, हीच आपल्या पुरोगामी महाराष्ट्राचा वारसा आणि संस्कृती आहे का असा प्रश्न करत सरकारला पाठिंबा देणाऱ्या संजय गायकवाड यांच्या वक्तव्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करत आपली भूमिका जाहीर करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड यांनी केली आहे.

कॉ.गोविंद पानसरे लिखित पुस्तकावरून प्रकाशकाना आ. संजय गायकवाड यांनी खालच्या पातळीवर जाऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या कथित संभाषणात स्त्री जातीबद्दल अवमानकारक शब्द प्रयोग करण्यात आले.एकीकडे नारी वंदनाची भाषा करायची व दुसरीकडे महिलांबद्दल अर्वाच्य भाषा वापरणाऱ्यांचा पाठिंबा घेत त्यांच्या कृतीचे, मौन बाळगत समर्थन करायचे का? योग्य कारवाई करणार याबाबत भूमिका स्पस्ट करण्याची मागणी केली तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांच्या उपस्थितीमध्ये कथा पान 3 वर

# महिलांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहून वेळोवेळी सर्व तपासण्या केल्या पाहिजे - नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

● परळीत महिलांसाठी आयोजित मोफत कर्करोग निदान शिबिराचे नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन




परळी वैजनाथ: प्रतिनिधी...

आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची आरोग्यविषयक काळजी वाहणाऱ्या महिलांनी स्वतःच्या आरोग्याबाबतही जागरूक राहून वेळोवेळी सर्व तपासण्या केल्या पाहिजे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी केले. परळी वैजनाथ येथील अरिहंत जैन सेवाभावी संस्था आणि विवेकानंद कॅन्सर अँड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'मोफत कर्करोग निदान शिबिरा'चे उद्घाटन परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

परळी वैजनाथ येथे आयोजित मोफत शिबिराचा मोठ्या संख्येने महिला वर्गाने लाभ घेतला. या शिबिरात गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग आणि स्तनांचा कर्करोग निदानासाठी आधुनिक 'कोल्पोस्कोपी' व 'थर्मल ब्रेस्ट स्क्रीनिंग'द्वारे तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. डॉ. वैशाली भावठाणकर, डॉ. स्मिता तापडीया आणि डॉ. सौ. सुनीता झांवर यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले.यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या युगात महिला आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेतात, मात्र स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. विशेषतः कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे पान 3 वर

# तरुणांनी व्यसनाकडे न वळता धम्माकडे वळावे - भन्ते पय्यानंद थेरो




परळी प्रतिनिधी. आजच्या तरुणांनी व्यसनाकडे न वळता धम्माकडे वळावे असे प्रतिपादन लातुर येथील भन्ते पय्यानंद थेरो यांनी केले.ते परळी येथे विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या धम्मदेशना प्रसंगी बोलत होते.तर बुद्ध धम्म हा आचरणातून दिसला पाहिजे असे मत भारतीय बौद्ध महासभेचे परळी तालुकाध्यक्ष हनुमंत पान 3 वर

# नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत दोन ठिकाणी अमानुष मारहाण; तक्रार घेण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप



बीड : बीड तालुक्यातील नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या गंभीर मारहाणीच्या घटना समोर आल्या असून त्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. कुऱ्हाड, अँगल, दांडके तसेच गमछामध्ये दगड बांधून करण्यात आलेल्या हल्ल्यांमध्ये दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. मात्र, व्हिडिओ समोर येऊनही पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील लोणीघाट येथे भावा-भावामध्ये झालेल्या वादात अनिल श्रीरंग मिटकरी (वय 40) यांना कुऱ्हाड, अँगल व दांड्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. पान 3 वर

# कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर ऊसतोड मजूर महिलांवर जमिनीवरच उपचार, बीड जिल्ह्यातील प्रकार




बीड :बीड जिल्ह्याचा कणा असलेल्या ऊसतोड मजुरांच्या नशिबी असलेली परवड काही केल्या संपण्याचे नाव घेत नाही. कष्टाचे डोंगर उपसून ऊसतोडीचा हंगाम संपवून परतलेल्या महिला मजुरांना आता सरकारी दवाखान्यातही अपमानास्पद वागणूक मिळत आहे. केज तालुक्यातील विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर पाच महिलांना चक्क जमिनीवर झोपवून उपचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. या घटनेने आरोग्य विभागाचे ढिसाळ नियोजन चव्हाट्यावर आले आहे.22 एप्रिल रोजी विडा आरोग्य केंद्रात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण 15 महिलांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मात्र, आरोग्य केंद्रात केवळ 10 बेड उपलब्ध होते. उर्वरित पाच महिलांना शस्त्रक्रियेसारखी गंभीर प्रक्रिया पान 3 वर

# चर्चेतील चेहरा' कार्यक्रमात आदर्श सरपंच ॲड मयूर आंधळे यांचा केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते सन्मान

वडवणी प्रतिनिधी

समाजामध्ये विविध क्षेत्रात तसेच गाव विकासामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'चर्चेतील चेहरा' या उपक्रमांतर्गत सन्मानित करण्यात येते. यावर्षी वडवणी तालुक्यातील रुई येथील आदर्श व युवा सरपंच ॲड मयूर आंधळे यांची निवड करण्यात आली होती.

छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध रामा इंटरनॅशनल हॉटेलमध्ये बुधवार, दि. 22 एप्रिल रोजी आयोजित दिमाखदार



सोहळ्यात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते ॲड.मयूर आंधळे यांचा कुटुंबियांसह सन्मान करण्यात आला.

यावेळी दिव्य मराठीचे संपादक प्रणव गोळवळकर, सीईओ नितिश जैन, जाहिरात विभाग प्रमुख सुभाष बोंद्रे, विभागीय व्यवस्थापक ज्ञानेश्वर देवकते, तसेच ॲड मयूर आंधळे यांचे वडील माजी सरपंच शंकरराव आंधळे, आई छायाताई आंधळे, बंधू भाजपा युवा मोर्चा बीड अध्यक्ष संजय आंधळे, नगरसेवक अमोल आंधळे,शुभम जायभाये, कृष्णा आंधळे यांच्यासह ग्रामपंचायत पान 3 वर

# सेवाभावाला सलाम! परळीतील फड दाम्पत्याचा 'आरोग्यदूत' सन्मानानंतर कारभारी उजगरे मित्र

परळी वैजनाथ (धनंजय माने ) :- आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय व समाजाभिमुख कार्य करणारे डॉ. रवी फड व डॉ. स्वप्निता फड-गुट्टे यांचा सकाळ ग्रुप तर्फे "आरोग्यदूत" पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या या सन्मानामुळे परळी शहरासह ग्रामीण भागात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.



ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना योग्य, परवडणारी आणि वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी फड दाम्पत्य सातत्याने प्रयत्नशील असून, त्यांच्या सेवाभावी कार्याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळाले असून समाजात विश्वास निर्माण झाला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल कारभारी मित्र मंडळाच्या वतीने पान 3 वर

# वादळी वाऱ्यामुळे लिंबाचे झाड कोसळून महिलेचा दुर्दैवी मृत्यू



माजलगाव : तालुक्यातील मोगरा येथे शुक्रवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतातील लिंबाचे झाड कोसळून सुमनबाई हरिभाऊ घनघाव या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर शोककळा पसरली आहे.मोगरा येथे शुक्रवारी जोरदार वादळी वाऱ्यामुळे एक दुर्दैवी अपघात घडला. शेतात असताना लिंबाचे झाड अचानक कोसळले. यावेळी झाडाची फांदी सुमनबाई हरिभाऊ घनघाव यांच्या पोटात घुसली. या गंभीर जखमेमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत त्यांना माजलगाव व संभाजीनगर येथे उपचारासाठी हलवले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पान 3 वर